# मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे वनवृत्त, ठाणे यांचे कार्यालय

मायक्रो वेव्ह टॉवर, बारा बंगला एरिया, कोपरी, ठाणे (पूर्व) 400 603.
फोन : 022-25329865/ 25329642, फॅक्स 022-25329912.
Email: ccftthane@mahaforest.gov.in / ccfthane@gmail.com
Website: www.mahaforest.gov.in

महाराष्ट्र वन विभाग

ISO 9001:2008
Certified by IRQS

MGMT. SYS.
RvA C 071


ज्ञापन

**विषय :- Diversion of Forest land 0.1320 ha. for laying Natural Gas Pipeline.**

जा.क्र. कक्ष-१०/वसं/प्र.क्र. ४० /१९-२०/जा.क्र. ३५९ /१९-२०.
ठाणे - ४००६०३, दिनांक - १४/१०/२०१९

संदर्भ :- उपवनसंरक्षक डहाणू यांचेकडील पत्र क्र.अ/२०/जमिन/८७१, दि.२५.०९.२०१९.

विषयांकित प्रस्ताव उपवनसंरक्षक डहाणू यांजकडून प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावाची छाननी केली असता परिपूर्ण स्वरुपात प्रस्ताव सादर केलेला नाही. त्यातील त्रुटी खालील प्रमाणे :-

१) पृष्ठ क्र.४१ वर जोडलेल्या प्रमाणपत्रावर **"The following Survey Nos. of Non Forest Land"** असे नमूद केलेले आहे. परंतू कोणत्याही सर्व्हे क्रमांकांची यादी अथवा सर्व्हे क्र. नमूद करण्यात आलेले नाहीत.

२) प्रस्तावात समाविष्ट ७/१२ दस्ताऐवज आंग्ल भाषेत रुपांतरीत करुन जोडण्यात यावे.

३) संदर्भित पत्रात संपूर्ण क्षेत्राचा वैधानिक दर्जा **PF** नमूद केलेला आहे, परंतु जोडण्यात आलेल्या नकाशावर मौजे उपलाट, सर्व्हे नं.१२८१, १०५०, १२७९ चा दर्जा खाजगी वन आणि सर्वे क्र.१२८२ चा दर्जा **Protected Forest** असा नमूद केलेला आहे आणि मौजे आमगाव येथील गट क्र.१११ चा दर्जा खाजगी वने असा दर्शविलेला आहे. मौजे उपलाट सर्व्हे क्र.१२८१, १०५० व १२७९ व मौजे आमगाव सर्व्हे क्र.१११ चे क्षेत्र खाजगी वनाचे दर्शविलेले असून, तथापी त्याचा निश्चित दर्जा जसे चौकशीवर प्रलंबित दिनांक २५.१०.१९८० पूर्वी पुर्नस्थापित, दि.२५.१०.१९८० नंतर पुर्नस्थापित अथवा शासन विहीत आहे किंवा कसे याबाबत स्पष्टता करुन सोबत संबंधित आदेशाच्या प्रती देखिल जोडण्यात याव्यात.

वरील प्रमाणे प्रस्तावित क्षेत्राच्या दर्जा बाबत खात्री होऊन विहीत नमुन्यातील क्षेत्र विवरण तक्त्या मध्ये माहिती देण्यात यावी.

४) मौजे आमगाव येथील सर्व्हे क्र.११८ चे ०.०३४८ हेक्टर क्षेत्र समाविष्ट आहे. परंतू ७/१२ दस्तऐवज सर्व्हे क्र.११८/१, ११८/२, ११८/३, अ, ब, क, ड, ई, फ, ग, ११८/४, ११८/५, ११८/६, ११८/७, ११८/८, ११८/९ इत्यादी जोडण्यात आलेले आहेत. या पैकी नेमक्या कोणत्या पार्ट / हिस्सा मधून पाईपलाईन प्रस्तावित आहे याबाबत खात्री होऊन नमूद करावे.

SheetalRaut/46~~Sativali~~ Gujrat Gas pipeline

५) मौजे उपलाट सर्व्हे क्र.१०५० चे देखिल १०५०/१, १०५०/२ चे ७/१२ जोडण्यात आलेले आहेत. याबाबत देखिल उपरोक्त मुद्दा क्र.४ च्या अनुषंगाने खात्री करावी.

६) मौजे उपलाट येथिल सर्व्हे क्र.१२८२ चे क्षेत्र **Protected Forest** असून ७/१२ उता-यावर इतर हक्कात काही खातेदारांची नावे आहेत, या बाबत ही खात्री करावी.

वरील प्रमाणे मुद्दयांची पूर्तता करणेकामी प्रस्तावाचे संच परत करण्यात येत आहे. पूर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव फेर सादर करण्यात यावेत.

सहपत्र :- वरीलप्रमाणे

(नरेश झुरमुरे)
मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे.
o/c [signature] 10/10/15

प्रति,

उपवनसंरक्षक डहाणू.

प्रतिलिपी :- असोसिएटेट व्हाईस प्रेसिडेंट, गुजरात गॅस लिमिटेड, अहमदाबाद यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

SheetalRaut/466) Sativali